THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

THURSDAY, 14TH SEPTEMBER 1893.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

## रेव्हेन्यू डिपार्टमेंट.

मुक्काम जंजिरे, मुंबई, तारीख २२ माहे एप्रिल सन१८९०.

**नंबर २७४३-अ.**—पिट्रोलियम आक्ट नामक सन १८८६ चा आक्ट १२ वा ह्याच्या ११ व्या कलमामध्यें दिलेले अधिकार चालवून मुंबईचे गव्हर्नर इन् कौन्सिल ह्यांनीं, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांची आधीं मंजुरी आणवून, मुंबई इलाक्यांत पिट्रोलियम कबजांत ठेवण्याचे अगर एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याचे परवाने देण्याचें नियमन करण्याकरितां खालीं लिहिलेल्या कानू केल्या आहेत:—

### प्रथमारंभींचे ठराव.

१. ह्या कानूंमध्यें— अर्थ.

(१) "सदर्हू आक्ट" ह्या संज्ञेचा अर्थ सन १८८६चा पिट्रोलियम आक्ट असा आहे: "सदर्हू आक्ट".

(२) "मुंबई शहर" ह्या संज्ञेत, मुंबई येथील न्यायाच्या हैकोर्टाच्या साधारण अवलदिवाणी हुकुमतीच्या स्थानिक हद्दींच्या आंत विद्यमानकाळीं असलेल्या प्रत्येक जागेचा समावेश होतो; आणि "मुंबई शहर".

(३) आणि सदर्हू आक्टांत ज्या शब्दांची आणि संज्ञांची व्याख्या केलेली आहे, त्या शब्दांचा आणि संज्ञांचा सदर्हू आक्टांतल्या अर्थाप्रमाणेंच अर्थ असेल. पिट्रोलियम आक्टांत व्याख्या केलेले शब्द व संज्ञा.

२. ह्या कानूंतले जे ठराव भयकारक पिट्रोलियमास लागू आहेत, ते सगळ्या मुंबई इलाक्यास लागू होतील, आणि जे ठराव इतर प्रकारच्या पिट्रोलियमास लागू आहेत, ते, सदर्हू आक्टाच्या १ ल्या कलमाच्या ३ ऱ्या पोट-कलमाअन्वयें गव्हर्नर इन् कौन्सिल ह्यांनीं जाहिरनामा देऊन बाकीचा आक्ट ज्या प्रदेशास लागू केला असेल त्या प्रदेशास मात्र लागू होतील. स्थानिक व्याप्ति.

### पिट्रोलियम कबजांत ठेवणें.

३. पांचशें ग्यालनांपेक्षां जास्त पिट्रोलियम कबजांत ठेवण्याबद्दल अगर भयकारक पिट्रोलियम कबजांत ठेवण्याबद्दल परवाने देणें ते, तें पिट्रोलियम सांठविण्यासाठीं ज्या जागेचा उपयोग करावयाचा असेल ती जागा आणि सभोंवतालच्या इमारती ह्यांच्या दरम्यान सभोंवर निदान वीस फूट रुंदीची उघडी मोकळी जागा असेल तेव्हां मात्र आणि ज्या जागेंत पिट्रोलियम सांठवायाचें असेल, त्या जागेच्या संबंधानें विवक्षित अटी पुऱ्या केलेल्या असल्याशिवाय पिट्रोलि-

यम कबजांत ठेवण्याचे परवाने देऊं नयेत.

त्या जागेसंबंधानें खालील अटीही पुऱ्या करण्यांत आलेल्या असतील तेव्हां मात्र, देण्यांत येतील : त्या अटी येणेंप्रमाणें :—

(अ) मुंबई शहरांत, पिट्रोलियम सांठविण्यासाठीं ज्या इमारतीचा उपयोग करावयाचा असेल, ती इमारत चिरेबंदी अगर विटबंदी असून गच्चीच्या अगर लोखंडाच्या छपराची असली पाहिजे, आणि तिची जमीन विटांनीं अगर दगडांनीं फरसबंदी केलेली अगर मातीची असली पाहिजे, आणि आग लागली तर पिट्रोलियम त्या इमारतींतून बाहेर वाहून येऊं नये ह्मणून तिचीं दारें व खिडक्या वगैरे द्वारें रस्त्याच्या सपाटीच्या निदान दोन फूट वर बांधिलेलीं पाहिजेत किंवा त्या इमारतीची जमीन रस्त्याच्या सपाटीच्या निदान दोन फूट खालीं असली पाहिजे.

(ब) मुंबई शहराबाहेर, (अ) रकमेंत निर्दिष्ट केलेल्या अटींबरहुकुम अगर पुढील अटींबरहुकुम ती इमारत असली पाहिजे ; त्या अटी येणेंप्रमाणें :— पिट्रोलियम सांठविण्याची इमारत विटांची अगर मातीची बांधलेली असून दरवाजे शिवायकरून तिचा कोणताही इतर भाग बांधण्यांत ज्वालाग्राही पदार्थांचा उपयोग केलेला नसला पाहिजे ; आणि त्या इमारतीच्या भोंवतीं निदान चार फूट उंच भिंत अगर मातीचा बांध असून ती इमारत व सदर्हू भिंत अगर बांध ह्यांच्या दरम्यान त्या इमारतीच्या अगदीं जवळ व त्या इमारतीच्या सभोंवार, आगीच्या प्रसंगीं, त्या इमारतींत साठविलेलें सगळें पिट्रोलियम राहून तें बाहेर जाऊं नये इतका मोठा चर असला पाहिजे.

विशेष ठराव.

मात्र इतकेंच कीं, प्रसंगाप्रमाणें, सरकार अगर सदर्हू परवाना देणारा अमलदार ह्यास, विशेष कारणांसाठीं, सदर्हू अटींपैकीं कोणतीही अट अगर त्या सर्व अटी माफ करण्याचा अखत्यार आहे ; मात्र, तो परवाना सदर्हू प्रकारच्या अमलदारानें दिलेला असेल तेव्हां, त्यानें तो देण्याच्या आधीं तीं विशेष कारणें लिहून ठेविलीं पाहिजेत.

ज्या जागेसंबंधानें पिट्रोलियम कबजांत ठेवण्याचा परवाना दिलेला असेल, ती जागा पाहाणीस पात्र राहील.

४. परवाना देणाऱ्या अमलदाराला, अगर हेड कान्स्टेबलच्या दर्जाच्या किंवा त्याहून अधिक दर्जाच्या कोणत्याही पोलीस अमलदाराला, ज्या कोणत्याही जागेसंबंधानें पिट्रोलियम कबजांत ठेवण्याचा परवाना दिलेला असेल, त्या जागेंत, तिची पाहाणी करण्यासाठीं, सूर्योदय व सूर्यास्त ह्यांच्या दरम्यान कोणत्याही वेळीं जाण्याचा अखत्यार आहे.

परवानेवाल्यांनीं पाहाणी करण्याच्या कामीं मदत केली पाहिजे आणि आपल्या पिट्रोलियमचे नमुने मागितले असतां दिले पाहिजेत.

५. परवाना देणाऱ्या अमलदाराला अगर सदरीं सांगितलेल्या कोणत्याही पोलीस-अमलदाराला, परवानेवाल्याच्या कबजांत असलेलें कोणतेंही पिट्रोलियम ज्या कोणत्याही भांड्यांमध्यें सांठविलेलें असेल अगर ठेविलेलें असेल, त्यांतलीं कोणतींही भांडीं दाखविण्यास, त्यांची पाहाणी करण्याच्या कामीं आपणास लागेल ती मदत देण्यास, आणि नमुना घेण्यासाठीं आपण दाखवूं त्या पात्रांतून, नमुन्याची किंमत दिली ह्मणजे, आपणास नमुना देण्यास परवानेवाल्यास भाग पाडण्याचा अखत्यार आहे.

त्या परवानेवाल्यास, ह्या कायद्याच्या कारणांसाठीं, पिट्रोलियमचा व्यापारी समजलें जाऊन, सदर्हू रीतीनें मिळविलेल्या नमुन्याच्या तपासणीसंबंधानें, सदर्हू आक्टाच्या १३ व्या कलमांत जें काम चालवावें ह्मणून ठरविलें आहे, तें काम चालविलें पाहिजे.

## पिट्रोलियम एका जागेहून दुसऱ्या जागीं नेणें.

पिट्रोलियम एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याबद्दलचे परवाने केव्हां द्यावे.

६. पिट्रोलियम एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याबद्दलचे परवाने, असें न्यावयाचें पिट्रोलियम हवा आंत जाणार नाहीं अशा डब्यांमध्यें अगर सहज फुटणार नाहींत अशा इतर पात्रांमध्यें घातलेलें असेल तेव्हां अगर चांगल्या रीतीनें बूच मारलेल्या व फुटण्याची

भीति नाहीं अशा रीतीनें काळजीपूर्वक पेट्यांमध्यें प्याक केलेल्या बाटल्यांमध्यें घातलेलें असेल तेव्हां मात्र देण्यांत येतील.

असें पिट्रोलियम गाडींत घालून न्यावयाचें असेल तेव्हां, तें फक्त सूर्योदय व सूर्यास्त ह्यांच्या दरम्यान नेलें पाहिजे.

७. परवान्याअन्वयें एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्यांत येत असलेलें पिट्रोलियम, केवळ सदरील शेवटल्या कानूंत सांगितल्या रीतीनें आणि परवान्यांत निर्दिष्ट केलेल्या मार्गानें नेण्यांत येत आहे किंवा नाहीं हें पाहाणें सर्व पोलीस अमलदारांचें काम आहे; आणि अशा कोणत्याही अमलदारास, एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्यांत येत असलेलें पिट्रोलियम थांबवून त्याची पाहाणी करण्याचा आणि जरूर असल्यास, तें पिट्रोलियम हवाली असलेल्या मनुष्यास ह्या कानूंतील ठरावांप्रमाणें अगर एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याबद्दलच्या परवान्यांत सांगितलेल्या अटींपैकीं कोणत्याही अटीप्रमाणें वागण्यास भाग पाडण्याचा, अखत्यार आहे.

एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्यांत येत असलेल्या पिट्रोलियमची पाहाणी करण्याचा पोलीसचा अधिकार.

## परवाने देणें.

८. चाळीस ग्यालनांहून अधिक भयकारक पिट्रोलियम कबजांत ठेवण्याच्या अगर एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याच्या लैसेन्सासाठीं सदर्हू आक्टाच्या ९ व्या कलमाअन्वयें करावयाचे अर्ज मुंबई शहरांत कमिशनर आफ पोलीस ह्यांकडे, एडनांत रेसिडेंटाकडे आणि इतर ठिकाणीं भागाच्या कमिशनराकडे रुजू केले पाहिजेत, ह्मणजे ते अमलदार त्या अर्जाबद्दल चौकशी करून ते आपापल्या अभिप्रायासहित सरकारांत रेव्हेन्यू डिपार्टमेंटाकडे पाठवितील.

भयकारक पिट्रोलियम कबजांत ठेवण्यांच अगर एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याचे आक्टाच्या ५ व्या कलमाखालीं द्यावयाचे परवाने कसे मिळवावे.

असा अर्ज मंजूर करण्यांत आला तर, तो परवाना, त्यावर सेक्रेटरी निसबत सरकार ह्यांची सही होऊन, ज्या अमलदाराकडे अर्ज रुजू केलेला असेल, त्या अमलदाराच्याद्वारें अर्जदाराकडे पाठविण्यांत येईल.

९. सदर्हू आक्टाच्या ९ व्या कलमाखालीं न येणारें पिट्रोलियम कबजांत ठेवण्याच्या अगर एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याच्या परवान्यांसाठीं करावयाचे अर्ज, यांत खालीं निर्दिष्ट केलेल्या अमलदारांकडे केले पाहिजेत : त्या अमलदारांनीं त्यांपैकीं कोण कोणते परवाने द्यावे तेंही येथें निर्दिष्ट केलें आहे :—

पिट्रोलियम कबजांत ठेवण्याचे अगर एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याचे इतर परवाने कसे मिळवावे.

| परवान्याचा प्रकार. | ज्या जागीं परवाना मिळण्याचा अर्ज केला असेल ती जागा. | परवाना कोणीं द्यावा. |
|---|---|---|
| (१) एकाच इसमानें अगर एकाच जागीं चाळीस ग्यालन अगर चाळीस ग्यालनांपेक्षां कमी भयकारक पिट्रोलियम ठेवण्याचा परवाना.<br>(२) एकाच इसमानें अगर एकाच जागीं पांचशें ग्यालनांपेक्षां जास्त पिट्रोलियम ठेवण्याचा परवाना. | (१) मुंबई शहर.<br>(२) एडन.<br>(३) इतर ठिकाणीं. | (१) म्युनिसिपल कमिशनर.<br>(२) रेसिडेंट.<br>(३) जिल्हा माजिस्ट्रेट अगर सरकार वेळोवेळीं मुंबई सरकारी गॅझेटांत जाहिरनामा देऊन ज्या कोणत्याही दुसऱ्या अमलदारास ह्यासंबधानें मुद्दाम अधिकार देईल तो अमलदार. |

| परवान्याचा प्रकार. | ज्या जागीं परवाना मिळण्याचा अर्ज केला असेल ती जागा. | परवाना कोणीं द्यावा. |
|---|---|---|
| (३) चाळीस ग्यालन अगर चाळीस ग्यालनांपेक्षां कमी भयकारक पिट्रोलियम एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याचा परवाना.<br>(४) पांचशें ग्यालनांपेक्षां जास्त पिट्रोलियम एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याचा परवाना. | (१) मुंबई शहर.<br>(२) एडन.<br>(३) इतर ठिकाणीं. | (१) पोलीस कमिशनर अगर डेप्युटी कमिशनर.<br>(२) रेसिडेंट.<br>(३) जिल्हा माजिस्ट्रेट, अगर सरकार सदरीं सांगितलेल्या रीतीनें ज्या कोणत्याही दुसऱ्या अमलदारास ह्यासंबंधानें मुद्दाम अधिकार देईल, तो दुसरा कोणी अमलदार. |

परवान्यांकरितां अर्ज कसे करावे.

१०. (१) पिट्रोलियम कबजांत ठेवण्याचे अगर एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याचे परवाने मिळण्यासाठीं करावयाचे अर्ज लेखी असले पाहिजेत.

(२) पिट्रोलियम कबजांत ठेवण्याच्या परवान्याकरितां केलेल्या अर्जांत खालीं निर्दिष्ट केलेला तपशील असला पाहिजे :—

(अ) अर्जदार जें पिट्रोलियम कबजांत ठेवण्यास इच्छीत असेल, त्या पिट्रोलियमचा प्रकार व परिमाण ;

(ब) तें पिट्रोलियम ज्या जागेंत ठेवण्याचा विचार असेल, त्या जागेचें नांव व स्थान, आणि ती जागा कानू ३ हींतल्या अटींबरहुकुम आहे किंवा कसें तें ;

(क) अर्जदार तें पिट्रोलियम ज्या कारणासाठीं ठेवणार असेल, तें कारण ;

(ड) त्या जागेंत पिट्रोलियम ठेवण्याचा एकादा परवाना आधींच मिळालेला असल्यास, तो परवाना किती पिट्रोलियमबद्दल आहे तें.

(३) पिट्रोलियम एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याच्या परवान्यांकरितां केलेल्या अर्जांत खालीं निर्दिष्ट केलेला तपशील असला पाहिजे :—

(इ) जें पिट्रोलियम एका जागेहून दुसऱ्या जागीं न्यावयाचें असेल, त्या पिट्रोलियमचा प्रकार व परिमाण ;

(फ) तें पिट्रोलियम ज्या जागेहून ज्या जागेस न्यावयाचें असेल त्या जागांचीं नांवें ;

(ग) तें ज्या मार्गानें व साधनानें नेण्याचा इरादा असेल, तो मार्ग व तें साधन ; आणि

(ह) एका जागेहून दुसऱ्या जागीं न्यावयाचें पिट्रोलियम ज्या पात्रांत असेल, त्या पात्रांचा प्रकार.

(४) भयकारक पिट्रोलियम कबजांत ठेवण्याचे अगर एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याचे सदरहू ॲक्टाच्या ९ व्या कलमाअन्वयें परवाने मिळण्याकरितां करावयाच्या अर्जांमध्यें त्या कलमाच्या (२) ऱ्या पोटकलमांत असावा ह्मणून सांगितलेला तपशीलही असला पाहिजे.

११. सदर्हू आक्टाच्या ६ व्या अगर १० व्या कलमाखालीं केलेल्या कोणत्याही अर्जाचा निकाल करितांना, परवाना देणाऱ्या अमलदारास, आपल्या नजरेस येईल त्याप्रमाणें, आपल्या मनास योग्य वाटेल तितकें पिट्रोलियम कबजांत ठेवण्याबद्दल अगर एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याबद्दल परवाना देण्याचा अखत्यार आहे. किती पिट्रोलियमबद्दल परवाना द्यावा तें.

१२. पिट्रोलियम कबजांत ठेवण्याचा प्रत्येक परवाना, तो ज्या तारिखेस देण्यांत येईल त्या तारिखेपासून एक वर्षपर्यंत अमलांत राहील, आणि पिट्रोलियम एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याचा प्रत्येक परवाना, तो ज्या तारिखेस देण्यांत येईल, त्या तारिखेपासून तीन महिन्यांपेक्षां जास्त नाहीं इतकी जी मुदत सरकार अगर तो परवाना देणारा अमलदार ठरवील, त्या मुदतीपर्यंत अमलांत राहीलः मात्र, अशी मुदत संपण्याच्या आधीं योग्य अधिकाऱ्यानें तो परवाना रद्द केला तर सदरील ठराव लागू होणार नाहीं. परवाने किती मुदतीपर्यंत अमलांत असतील तें.

१३. पिट्रोलियम कबजांत ठेवण्याचा परवाना नवीन करून मागण्याकरितां करावयाचा प्रत्येक अर्ज, मूळ परवाना मिळविण्याकरितां जसा अर्ज करावा लागतो, तसाच केला पाहिजे. असा प्रत्येक अर्ज, मूळ परवाना संपण्याच्या तारिखेच्या आधीं निदान पंधरा दिवस केला पाहिजे. परवाने नवीन करून मागण्याकरितां अर्ज कसे करावे.

### परवान्यांबद्दल फी.

१४. पिट्रोलियम कबजांत ठेवण्याच्या अगर एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याच्या मूळ अगर नवीन करून दिलेल्या परवान्यांबद्दल खालीं नमूद केलेल्या फी घेतल्या जातील :— फी किती घ्याव्या तें.

| | | रु० |
|---|---|---|
| (१) | चाळीस ग्यालनांपेक्षां जास्त भयकारक पिट्रोलियम कबजांत ठेवण्याचा परवानाः दर चाळीस ग्यालनांबद्दल अगर चाळीस ग्यालनांच्या कोणत्याही अंशाबद्दल... ... | ५ |
| (२) | चाळीस ग्यालनांपेक्षां जास्त भयकारक पिट्रोलियम एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याचा परवाना : दर चाळीस ग्यालनांबद्दल अगर चाळीस ग्यालनांच्या कोणत्याही अंशाबद्दल ... ... ... ... ... ... | ४ |
| (३) | चाळीस ग्यालनांपेक्षां जास्त नाहीं इतकें भयकारक पिट्रोलियम कबजांत ठेवण्याचा परवाना ... ... ... | ३ |
| (४) | चाळीस ग्यालनांपेक्षां जास्त नाहीं इतकें भयकारक पिट्रोलियम एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याचा परवाना ... | २ |
| (५) | भयकारक नसणारें पिट्रोलियम कबजांत ठेवण्याचा परवाना :— | |
| | (अ) सांठवून ठेवावयाचें पिट्रोलियम पांचशें ग्यालनांपेक्षां जास्त असेल परंतु एक हजार ग्यालनपेक्षां जास्त नसेल तेव्हां ... ... ... ... ... | १२ |
| | (ब) सांठवून ठेवावयाचें पिट्रोलियम एक हजार ग्यालनांपेक्षां जास्त असेल परंतु पांच हजार ग्यालनांपेक्षां जास्त नसेल तेव्हां एक हजार ग्यालनांपेक्षां जास्त असलेल्या प्रत्येक हजार ग्यालनांबद्दल अगर हजार ग्यालनांच्या अंशाबद्दल जादा ... ... | २ |
| | (क) सांठवून ठेवावयाचें पिट्रोलियम पांच हजार ग्यालनांपेक्षां जास्त असेल तेव्हां, पांच हजार ग्याल- | |

| | |
|---|---|
| नांपेक्षां जास्त असलेल्या दर हजार ग्यालनांबद्दल अगर हजार ग्यालनांच्या अंशाबद्दल जादा ... ... ... | रु० ४ |
| (६) भयकारक नसणारें पिट्रोलियम एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्यचा परवाना :— | |
| तें पिट्रोलियम पांचशें ग्यालनापेक्षां जास्त असेल परंतु पांच हजार ग्यालनांपेक्षां जास्त नसेल तेव्हां. ... | १ |
| दर जादा पांच हजार ग्यालनांबद्दल अगर पांच हजार ग्यालनांच्या अंशाबद्दल ... ... .... ... | १ |

**परवान्यांचे नमुने व त्यांतील शर्ती.**

परवान्यांचे नमुने व त्यांतील शर्ती परिशिष्टांत दिल्याप्रमाणें असाव्या.

१९. ह्या कानूंअन्वयें द्यावयाचे परवाने ह्या कानूंस जोडिलेल्या परिशिष्टांत दिलेल्या नमुन्यांवरहुकुम असले पाहिजेत, आणि त्यांत त्या त्या नमुन्यांत दाखल केलेल्या शर्टी असल्या पाहिजेत.

**परवाने रद्द करणें.**

सरकारास अगर परवाने देणाऱ्या अमलदारास परवाने केव्हां रद्द करण्याचा अख्त्यार आहे.

१६. ह्या कानूंअन्वयें दिलेला कोणताही परवाना धारणकरणारानें अगर त्याच्या कोणत्याही नोकरानें त्या परवान्याच्या कोणत्याही शर्ती अगर ह्या कानूंतल्या अगर सदरहू आक्टांतल्या कोणत्याही ठरावाचा भंग केल्याबद्दल सरकाराची अगर तो परवाना देणाऱ्या अमलदाराची अगर त्याच्या जागीं आलेल्या स्थानापन्नाची खात्री होईल अशा रीतीनें शाबिती झाली तर सरकारास अगर त्या अमलदारास तो परवाना कोणत्याही वेळीं रद्द करण्याचा अख्त्यार आहे.

---

**अ.**

**भयकारक पिट्रोलियम कबजांत ठेवण्याबद्दल सदहू आक्टाच्या ५व्या अगर ६व्या कलमाअन्वयें द्यावयाच्या परवान्याचा नमुना.**

नंबर

फी रुपये

ह्यावरून ह्यास ग्यालन भयकारक पिट्रोलियम ह्याच्या पाठीवर दाखल केलेल्या शर्तीस अनुसरून खालीं वर्णन केलेल्या जागीं ठेवण्याचा परवाना दिला आहे.

हा परवाना ह्याच्या तारिखेपासून एक वर्षपर्यंत अमलांत राहील; आणि हा परवाना पुनः नवीन करून द्यावा म्हणून तें वर्ष संपण्याच्या आधीं निदान पंधरा दिवस अर्ज करण्यांत आला म्हणजे तो पुनः नवीन करून देण्याचा अख्त्यार आहे.

सदरीं उल्लेख केलेल्या जागेचें वर्णन:—

(सही)

. सेक्रेटरी निसबत मुंबई सरकार.

पिट्रोलियम चाळीस ग्यालनांहून जास्त नसेल तेव्हां. { अगर मुंबईचे म्युनिसिपल कमिशनर, अगर, रेसिडेंट, एडन, अगर जिल्हा माजिस्ट्रेट.

**पाठीवर.**

हा परवाना खालील शर्तीस पात्र ठेवून दिलेला आहे:—

१. ज्या जागेच्या संबंधानें हा परवाना दिलेला आहे, त्या जागेंत ज्वालाग्राही पदार्थ बिलकुल सांठवूं नयेत.

२. सदर्हू पिट्रोलियम भरलेल्या प्रत्येक पेटीवर (अगर डबा, वगैरे ह्यावर) सदर्हू आक्टाच्या ७व्या कलमांत सांगितल्याप्रमाणें नांवाची चिठ्ठी असली पाहिजे.

३. ज्या इमारतींत सदर्हू पिट्रोलियम सांठविलेलें असेल, त्या इमारतीच्या आंत पिट्रोलियम भरलेलें कोणतेंही पात्र उघडूं नये आणि कोणत्याही पात्रांतून तेल काढूं नये.

४. त्या इमारतीच्या आंत कोणत्याही वेळीं कोणत्याही प्रकारें तमाखू वगैरे ओढूं देऊं नये, दिवा लावूं देऊं नये अगर विस्तव पेटवूं देऊं नये.

५. सरकार किंवा हा परवाना देणारा अमलदार जर, हा परवाना ज्या जागेबद्दल दिलेला असेल त्या जागेच्या सुरक्षितपणासाठीं सरकारच्या अगर त्या अमलदाराच्या मतें जरूर असलेल्या कोणत्याही मरामती करण्यास परवाना धारण करणारास लेखी नोटीस देऊन हुकुम करील, तर, त्या परवाना धारण करणारानें, त्या नोटिशींत सांगितलेल्या मुदतीच्या आंत (ही मुदत ती नोटीस पोंचण्याच्या तारिखेपासून एका आठवड्यापेक्षां कमी नसावी) त्या मरामती केल्या पाहिजेत.

६. हा परवाना धारण करणारानें, ह्या परवान्यांत दाखल केलेल्या पिट्रोलियमांतून तीन ग्यालनांहून जास्त पिट्रोलियम, सदर्हू आक्टाच्या ५ व्या किंवा ६व्या कलमाअन्वयें तितकें पिट्रोलियम कबजांत ठेवण्यास ज्या मनुष्यास परवाना मिळालेला नसेल त्या कोणत्याही मनुष्याच्या स्वाधीन करूं नयें. जर त्याला त्यांतून, तीन ग्यालनांपेक्षां जास्त नाहीं इतकें पिट्रोलियम कोणत्याही मनुष्याच्या स्वाधीन करावयाचें असेल, तर, त्यानें सदर्हू आक्टाच्या ६ व्या कलमाच्या विशेष ठरावांत असें पिट्रोलियम ज्या पात्रांत घालून द्यावयाचें त्या पात्राच्या संबंधानें जे ठराव आहेत त्या ठरावांस अनुसरून वागलें पाहिजे.

---

## ब.

**भयकारक पिट्रोलियम एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याबद्दल सदर्हू आक्टाच्या ५व्या अगर ६व्या कलमाअन्वयें द्यावयाच्या परवान्याचा नमुना.**

नंबर

फी रुपये

ह्यावरून राहाणार ह्यास सन १८८६

चा पिट्रोलियम आक्ट, कलम ह्याअन्वयें, एकंदर ग्यालन भयकारक पिट्रोलियम भरलेल्या पेट्या (किंवा डबे वगैरे, जसें असेल तसें) ह्या परवान्याच्या पाठीवर सांगितलेल्या शर्तीस अनुसरून खालीं निर्दिष्ट केलेल्या मार्गानें येथून येथें नेण्याचा परवाना दिला आहे: तो मार्ग येणेंप्रमाणें :—

प्रत्येक पेटींत (किंवा डबा वगैरे यांत) पिट्रोलियम किती आहे तें खालीं लिहिलें आहे:—

हा परवाना तारीख माहे सन १८९ पर्यंत मात्र अमलांत राहील.

(सही)

सेक्रेटरी निसबत सरकार.

पिट्रोलियम चाळीस ग्यालन पेक्षां जास्त नसेल तेव्हां. { अगर मुंबईचे पोलीस कमिशनर किंवा डेप्युटी कमिशनर
अगर रेसिडेंट, एडन,
अगर जिल्हा माजिस्ट्रेट.

पाठीवर.

हा परवाना खालीं लिहिलेल्या शर्तींस पात्र ठेवून दिला आहे :—

१. सदहू पिट्रोलियम झांकलेल्या होड्यांत / गाड्यांत घालून नेलें पाहिजे.

२. तें भरलेल्या प्रत्येक पेटीवर (अगर डबा, वगैरे ह्यावर) सदहू आक्टाच्या ७व्या कलमांत सांगितल्याप्रमाणें नांवाची चिठ्ठी असली पाहिजे.

३. तें पिट्रोलियम नेणाऱ्या होड्यांवर / गाड्यांवर कोणत्याही प्रकारें तमाखू वगैरे ओढूं देऊं नये, दिवा लावूं देऊं नये अगर विस्तव पेटवूं देऊं नये.

४. हा परवाना धारण करणारानें, ह्या परवान्यांत दाखल केलेल्या पिट्रोलियमांतून, तीन ग्यालनांहून जास्त पिट्रोलियम, सदहू आक्टाच्या ५ व्या किंवा ६ व्या कलमाअन्वयें तितकें पिट्रोलियम कबजांत ठेवण्यास ज्या मनुष्यास परवाना मिळाला नसेल, त्या कोणत्याही मनुष्याच्या स्वाधीन करूं नये. जर त्याला त्या पिट्रोलियमपैकीं तीन ग्यालनांपेक्षां जास्त नाहीं इतकें पिट्रोलियम कोणत्याही मनुष्याच्या स्वाधीन करावयाचें असेल, तर, त्यानें सदहू आक्टाच्या ६व्या कलमाच्या विशेष ठरावांत असें पिट्रोलियम ज्या पात्रांत घालून द्यावयाचें त्या पात्राच्या संबंधानें जे ठराव आहेत त्यांस अनुसरून वागलें पाहिजे.

५. पोलीस कमिशनरास अगर ज्या जिल्हा *माजिस्ट्रेटाच्या हुकुमतीच्या प्रदेशांतून ह्या परवान्यांत सांगितलेलें पिट्रोलियम जावयाचें असेल त्या जिल्हा माजिस्ट्रेटास त्या पिट्रोलियम बरोबर पाहारा पाठविणें जरूर वाटेल तर, हा परवाना धारण करणारानें सदहू प्रदेशाच्या आंत तें पिट्रोलियम नेण्यापूर्वीं, तो कमिशनर अगर *माजिस्ट्रेट ठरवील त्या दरानें अशा पाहाऱ्याचा खर्च दिला पाहिजे.

---

क.

**भयकारक नाहीं असें पिट्रोलियम कबजांत ठेवण्याबद्दल सदहू आक्टाच्या १० व्या कलमाअन्वयें द्यावयाच्या परवान्याचा नमुना.**

नंबर

फी रुपये

यावरून यास भयकारक नाहीं असें ग्यालन पिट्रोलियम खालीं वर्णन के-

---

* एडन येथें "माजिस्ट्रेट" शब्दाच्या ऐवजीं, "रेसिडेंट" हा शब्द दाखल करावा.

लेल्या जागीं ह्या परवान्याच्या पाठीवर दिलेल्या शर्तींस अनुसरून ठेवण्याचा परवाना दिला आहे.

हा परवाना तारीख माहे सन १८९ पर्यंत मात्र अमलांत राहील.

वर उल्लेख केलेल्या जागेचें वर्णन :—

(सही)

म्युनिसिपल कामिशनर, मुंबई.

अगर, रेसिडेंट, एडन.

अगर जिल्हा माजिस्ट्रेट.

तारीख माहे सन १८९ .

पाठीवर.

हा परवाना खालीं दिलेल्या शर्तींस पात्र ठेवून दिला आहे :—

१. हा परवाना ज्या जागेच्या संबंधानें दिलेला आहे त्या जागेंत ज्वालाग्राही पदार्थ बिलकुल साठवूं नयेत.

२. सदर्हू पिट्रोलियम ज्या इमारतींत सांठविलेलें असेल, त्या इमारतीच्या आंत पिट्रोलियम भरलेलें कोणतेंही पात्र उघडूं नये आणि कोणत्याहीं पात्रांतून तेल काढूं नये.

३. अशा इमारतींत कोणत्याही वेळीं कोणत्याही प्रकारें तमाखू वगैरे ओढूं देऊं नये, दिवा लावूं देऊं नये किंवा विस्तव पेटवूं देऊं नये.

४. परवाना देणारा अमलदार जर, हा परवाना ज्या जागेबद्दल दिलेला असेल त्या जागेच्या सुरक्षितपणासाठीं आपल्या मतें जरूर असलेल्या कोणत्याही मरामती करण्यास परवाना धारण करणारास लेखी नोटीस देऊन हुकुम करील, तर, त्या परवाना धारण करणारानें त्या नोटिशींत सांगितलेल्या मुदतीच्या आंत (ही मुदत ती नोटीस पोंचण्याच्या तारिखेपासून एका आठवड्यापेक्षां कमी नसावी) त्या मरामती केल्या पाहिजेत.

---

ड.

**भयकारक नाहीं असें पिट्रोलियम एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याबद्दल सदर्हू आक्टाच्या १० व्या कलमाअन्वयें द्यावयाच्या परवान्याचा नमुना.**

नंबर

फी रुपये

ह्यावरून ह्यास भयकारक नाहीं असें पिट्रोलियम भरलेल्या पेट्या (अगर डबे वगैरे) ह्या परवान्याच्या पाठीवर दिलेल्या शर्तींस अनुसरून व खालीं निर्दिष्ट केलेल्या मार्गानें येथून येथें नेण्यास परवाना दिला आहे : सदर्हू मार्ग येणेंप्रमाणें :—

हा परवाना तारिख माहे सन १८९ पर्यंत मात्र अमलांत राहील.

तारीख माहे सन १८९ .

(सही)

मुंबईचे पोलीस कमिशनर अगर डेप्युटी कमिशनर.

अगर, रेसिडेंट, एडन.

अगर, जिल्हा माजिस्ट्रेट.

पाठीवर.

हा परवाना खालीं दिलेल्या शर्तीस पात्र ठेवून दिला आहे :—

१. सदहू पिट्रोलियम झाकलेल्या होड्यांत / गाड्यांत घालून नेलें पाहिजे.

२. तें नेणाऱ्या होड्यांवर / गाड्यांवर कोणत्याही प्रकारें तमाखू वगैरे ओढूं देऊं नये, दिवा लावूं देऊं नये अगर विस्तव पेटवूं देऊं नये.

आलीजा बहादुर गव्हर्नर इन् कौन्सिल ह्यांच्या हुकुमावरून,

(सही) जे. न्युजंट,

चीफ सेक्रेटरी निसबत सरकार.

(True Translation.)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

## रेव्हिन्यू डिपार्टमेंट.

मुक्काम जंजिरे मुंबई, तारीख १९ जुलै सन १८९३.

**नंबर ५१६१.—सन १८९०च्या मुंबईच्या मिठाच्या आक्टाचीं कलमें ३७, ५२, ५८ व ५९ यांअन्वयें केलेल्या कानूंचा खालीं दिलेला खर्डा सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं प्रसिद्ध केला आहे, त्याविरुद्ध ज्या मनुष्यांना कोणत्याहि हरकती घेणें असतील त्यांनीं त्या, हा जाहिरनामा प्रसिद्ध केल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आंत, चीफ् सेक्रेटरी निसबत सरकार, रेव्हिन्यू डिपार्टमेंट, यांना लेखी सादर कराव्या:—**

---

सन १८९०च्या मुंबईच्या मिठाच्या आक्टाचीं कलमें ३७, ५२, ५८ व ५९ यांवरून दिलेले अधिकार चालवून गव्हर्नर इन कौन्सिल यांनीं खालीं दिलेल्या कानू केल्या आहेत, आणि ते असें फर्मावितात कीं या कानू ज्या ज्या बाबतींच्या संबंधाच्या आहेत त्या त्या बाबतींसंबंधी सर्व विद्यमान कानू रद्द होऊन या कानू ———— रोजीं व त्यानंतर अमलांत येतील.

### प्रारंभींचे नियम.

१. या कानूंस सन १८९३च्या मुंबईच्या मिठाबाबद कानू असें ह्मणावें. — *लहान सरनामा.*

### मिठागरांत मीठ ठेवणें व सांठवून ठेवणें याबाबद.

*किती मुदतीपर्यंत मीठ कोंड्यांच्या बाजूस पडूं देणें.*

१. अ कोणत्याहि मनुष्यानें आपल्या ताब्यांत असलेलें कोणतेंहि मीठ १० दिवसांहून अधिक मुदतीपर्यंत, किंवा मिठाच्या महसुलाच्या कलेक्टरानें केलेला ह्मणून जो कोणताहि साधारण किंवा विशेष हुकुम त्यास कळविण्यांत आला असेल त्या हुकुमाअन्वयें दिलेल्या मुदतीहून अधिक मुदतीपर्यंत, रास केल्यावांचून पडूं देऊं नये.

*कांहीं प्रसंग खेरीज करून इतर प्रसंगीं चाळण्याची व सुकविण्यासाठीं पसरण्याची मनाई आहे.*

२. मिठागरांत पहिल्यानें राशी करून सांठवून ठेवण्यापूर्वी किंवा प्रिव्हेंटिव्ह स्टेशनाच्या पलीकडे निदान एक मैलाच्या अंतरावर नेल्यानंतर चाळण्याचे किंवा सुकविण्यासाठीं पसरण्याचे प्रसंग खेरीजकरून इतर प्रसंगीं कोणत्याहि मनुष्यानें, कमिशनराच्या विशेष मंजुरीवांचून, कोणतेंहि मीठ चाळूं नये किंवा सुकविण्यासाठीं पसरूं नये.

*आणि सरकारकुनानें नेमलेल्या जागा खेरीज करून इतर जागीं चाळण्याची व सुकविण्यासाठीं पसरण्याची मनाई आहे.*

३. पहिल्यानें सांठवून ठेवण्यापूर्वी कोणत्याहि मनुष्यानें, त्या कारणासाठीं सरकारकुनानें नेमलेल्या जागा खेरीजकरून इतर जागीं मीठ चाळूं नये अगर सुकविण्यासाठीं पसरूं नये.

*प्रत्येक हंगामाचें मीठ निरनिराळें सांठवून ठेवणें.*

४. मीठ पिकविण्याच्या प्रत्येक हंगामांत किंवा हंगामाच्या मुदतींत उत्पन्न झालेलें मीठ, मीठ पिकविण्याच्या इतर प्रत्येक हंगामांत किंवा हंगामाच्या मुदतींत उत्पन्न झालेल्या मिठापासून निराळें सांठवून ठेवणें लैसेन्सवाल्यास भाग आहे असें समजावें; मात्र सरकारकुनानें इतर रीतीनें करण्याविषयीं विशेष परवानगी दिली असेल तर सदर्हूप्रमाणें समजूं नये.

*सांठवून ठेवण्याचे प्लाटफार्म.*

५. मिठाच्या महसुलाच्या कलेक्टराचे जे साधारण किंवा विशेष हुकुम विवक्षित काळीं अमलांत असून या बाबतींत लागू असतील त्या हुकुमांस अनुसरून असलेला कोणताहि आकार किंवा कोणतेंहि परिमाण किंवा कोणतीहि जागा खेरीजकरून इतर कोणत्याहि आकाराचा किंवा कोणत्याहि परिमाणाचा किंवा कोणत्याहि जागेंत कोणताहि मीठ सांठवून ठेवण्याचा प्लाटफार्म अगर कोणतीहि मिठाची रास कोणत्याहि मनुष्यानें करूं नये किंवा करवूं नये किंवा करूं देऊं नये.

*पूर्वी फोडलेली मिठाची रास संपेपर्यंत दुसरी कोणतीहि मिठाची रास फोडूं नये.*

६. परवान्याप्रमाणें मीठ देण्यासाठीं मिठाची एक रास फोडली ह्मणजे लैसेन्सवाल्यानें, त्या फोडलेल्या राशीचा निकाल होऊन ती अगदी संपेपर्यंत, सरकारकुनाच्या लेखी परवानगीवांचून, त्याच परवान्याप्रमाणें मीठ देण्यासाठीं त्याच मिठागरांतील इतर कोणत्याहि राशींतून मीठ घेऊं देऊं नये.

*मिठाच्या राशी फोडण्याची इयत्ता.*

७. कोणत्याहि मनुष्यानें, जी कोणतीहि मिठाची रास न फोडण्याविषयीं सरकारकुनानें त्यास फर्माविलें असेल ती रास फोडूं नये, किंवा फोडवूं नये किंवा फोडूं देऊं नये. जी कोणतीहि मिठाची रास फोडलेली असेल ती लैसेन्सवाल्यानें सरकारकुन फर्मावील त्या रीतीनें बंद केली पाहिजे.

*कित्येक प्रसंगीं अपुऱ्या राशींत ज्यास्त मीठ घालूं नये अगर तिच्यांतून मीठ नेऊं नये.*

८. जी कोणतीहि मिठाची रास अंशतः केली असून पुरी केलेली नसेल त्या राशीस जकातचोरीनें मीठ नेल्यामुळें, पाउसामुळें, पुरामुळें किंवा कोणत्याहि असाधारण आकस्मिक गोष्टीमुळें नुकसान झालें तर, किंवा असें नुकसान झाल्याच्या कारणावरून सजेदार त्या राशींत ज्यास्त मीठ घालण्याची किंवा तिच्यांतून तें नेण्याची मनाई करील तर, ती रास सरकारकुनाकडून किंवा त्यानें नेमलेल्या कोणत्यातरी अमलदाराकडून तपासली गेल्याशिवाय व तपासली जाईपर्यंत कोणत्याहि मनुष्यानें त्या राशींतील मिठांत कोणतेंहि मीठ ज्यास्त घालूं नये किंवा घालवूं नये किंवा घालूं देऊं नये, अगर, त्या राशींतील मिठांतून कोणतेंहि मीठ नेऊं नये किंवा नेववूं नये किंवा नेऊं देऊं नये.

*पुऱ्या राशींत मीठ ज्यास्त घालूं नये.*

९. कोणतीहि रास एकवेळ करून पुरी केल्यानंतर तींत कोणत्याहि मनुष्यानें कोणत्याहि वेळीं कोणतेंहि मीठ ज्यास्त घालूं नये किंवा घालवूं देऊं नये किंवा घालूं देऊं नये.

## मीठ ठेवण्याबाबद.

*परवानगीवांचून कोठाराजवळ मीठ ठेवूं नये किंवा राहूं देऊं नये.*

१०. कोणत्याहि मनुष्यानें कानडा जिल्ह्यांतील कोणत्याहि मिठागरांत, ज्या मिठावर जकातीची ड्यूटी दिलेली नसेल तसें मीठ सांठवून ठेवण्यासाठीं ज्या कोणत्याहि कोठाराचा किंवा इमारतीचा उपयोग केलेला असेल किंवा उपयोग करण्याचा इरादा असेल त्या कोठारापासून किंवा इमारतीपासून २०० यार्डांच्या आंत सरकारकुनानें त्या कारणासाठीं नेमून दिलेली जमीन खेरीज करून इतर कोणत्याहि जमिनीवर कोणतेंहि मीठ ठेवूं नये किंवा ठेववूं नये किंवा ठेवूं देऊं नये; आणि तशा कोणत्याहि जमिनीवर मीठ ठेवणाऱ्या कोणत्याहि मनुष्यास तें तेथून नेण्याविषयीं सरकारकुनानें हुकुम केल्यास त्या मनुष्यास तावडतोब तसें करणें भाग आहे.

## मीठ नेण्याबाबद.

*मीठ निशाणी केलेल्या गोणांतून नेणें.*

११. या कानूंत पुढें इतर रीतीनें ठरविलें आहे तेवढें खेरीजकरून, मिठागरांतून मीठ नेणें तें, ज्यांच्यावर सुवाच्य रीतीनें अनुक्रम नंबर, व ज्या मनुष्याच्या वतीनें मीठ न्यावयाचें असेल त्याच्या सहीचीं आद्यक्षरें किंवा इतर दर्शक निशाणी, हीं लिहिलेलीं असतील तशा गोणांशिवाय इतर प्रकारें कोणी नेऊं नये: मात्र इतकेंच कीं खाराघोडा येथील सरकारी मिठागरांतून दास्तानांत, किंवा सानिकट्टा येथील मिठागरांतून कोठारांत न्यावयाचें मिठास, अगर कलेक्टराच्या विशेष हुकुमांअन्वयें किंवा वंजाऱ्यांनीं नेलेल्या मिठास, ही कानू लागू नाहीं असें समजावें.

## मिठगरांच्या स्वच्छतेबाबद.

*घाण करण्याची मनाई.*

१२. कोणत्याहि मनुष्यानें कोणत्याहि मिठागराच्या हद्दींच्या आंत घाण करूं नये.

## विक्रीकरितां मीठ वखारींत भरून ठेवण्याबाबद.

*लैसेन्साचे नमुने.*

१३. सदहू आक्टाच्या ३६ व्या कलमांत सांगितलेल्या हद्दींपैकीं कोणत्याहि हद्दींच्या आंत विक्रीकरितां मीठ सांठवून ठेवण्यासाठीं किंवा कबज्यांत ठेवण्यासाठीं सदहू आक्टाच्या ३७ व्या कलमाअन्वयें कलेक्टरानें दिलेले लैसेन्स मिठाच्या ठोक विक्रीबाबद किंवा किरकोळ विक्रीबाबद असले पाहिजेत, आणि ते या कानूंस जोडलेल्या नमुन्याप्रमाणें

असून त्यांत, सदर्हू नमुन्यांत निर्दिष्ट केलेल्या शर्ती दाखल केलेल्या असल्या पाहिजेत. सदर्हू शर्ती गव्हर्नर इन् कौन्सिल यांनीं सदर्हू आक्टाचें कलम ३७ (१) याअन्वयें केलेल्या कानू आहेत असें मानलें पाहिजे व त्यांचा अशा कानूंप्रमाणेंच अमल चालेल असें समजावें.

लैसेन्स केव्हां घ्यावें व त्यांची मुदत केव्हां संपते.

१४. प्रत्येक लैसेन्स घेणें तो दर वर्षी जानेवारीच्या १ ल्या तारखेपर्यंत घेतला पाहिजे, व तो पुढील डिसेंबरच्या ३१ व्या तारखेपर्यंत अमलांत राहील, त्यानंतर अमलांत राहणार नाहीं.

नवीन करून देण्यास इनकार करण्याचा अधिकार आहे.

१५. एकादा लैसेन्स रद्द करण्याचीं किंवा नवीन करून देण्यास इनकार करण्याचीं कोणतींहि कारणें दिल्यावांचून तो रद्द करण्याचा किंवा नवीन करून देण्यास इनकार करण्याचा कलेक्टरास अख़त्यार आहे.

प्रत्येक दुकानाबद्दल किंवा वखारीबद्दल निराळा लैसेन्स.

१६. एकाद्या लैसेन्सवाल्याची, विक्रीच्या कारणांसाठीं, एकाहून अधिक दुकानें किंवा वखारी घालण्याची इच्छा असल्यास त्यानें अशा प्रत्येक दुकानाबद्दल किंवा वखारीबद्दल निराळा लैसेन्स मिळविला पाहिजे.

ज्या कित्येक शर्तीस असे लैसेन्स पात्र असले पाहिजेत त्या शर्ती.

१७. असा प्रत्येक लैसेन्स, लैसेन्सवाल्यानें किंवा त्याच्या कोणत्याहि नोकरानें त्या लैसेन्साच्या कोणत्याहि शर्तीचें किंवा सदर्हू आक्टांतील कोणत्याहि ठरावाचें उलंघन केलें असतां, कोणत्याहि वेळीं सस्पेंड किंवा रद्द केला जाण्यास पात्र आहे असें समजावें.

## धरलेल्या पदार्थांची व्यवस्था व नाश करण्याबाबद.

सरकारदाखल केलेल्या खाऱ्या मातीचा नाश करणें.

१८. सरकारदाखल केलेल्या खाऱ्या मातीचा नाश केला पाहिजे.

सरकार दाखल केलेला जो माल बिघडण्यासारखा असेल त्याची व्यवस्था.

१९. सदर्हू आक्टाअन्वयें माल धरल्यानंतर कोणत्याहि वेळीं, सरकारकुनाहून कमी दरज्याचा नव्हे अशा अमलदारास असा कोणताहि माल स्वाभाविक रीत्या व जलद नासला जाण्यास पात्र आहे असें दिसल्यास, तो तावडतोब जाहिर लिलांव करून विकावा अगर, तो विकण्यालायक नसेल तर, त्याचा नाश करावा असें फर्माविणें त्या अमलदारास कायदेशीर आहे असें समजावें.

धरलेल्या जनावराची पाळणावळ.

२०. सरकारकुनांहून किंवा इन्स्पेक्टरांहून कमी दरज्याचा नव्हे अशा वर्गाचा कोणताहि अमलदार, कलम ९२ (ब) यांत निर्दिष्ट केलेले हुकुम ज्या कोणत्याहि बाबतींत त्या कलमांतील ठरावांअन्वयें देतां येतील त्या बाबतींत देण्यास मुख़त्यार आहे.

विक्र्यांच्या फाजील उत्पन्नाची कशी व्यवस्था करावी.

२१. १९ व्या व २० व्या कानूंअन्वयें केलेल्या सर्व विक्र्यांच्या फाजील उत्पन्नावर विकलेल्या मिळकतीच्या मालकानें विक्री झाल्यापासून तीन महिन्यांच्या आंत आपला दावा शाबीत न केल्यास, तें फाजील उत्पन्न मलिकामा आझमांच्या नांवें दाखल होईल असें समजावें.

## शिक्षेबाबद.

कानू १ अ, २, ३, ४, ५, ६, ७, ८, ९, १० व ११ यांचें किंवा १३ व्या कानूअन्वयें दिलेल्या लैसेन्साच्या कोणत्याहि शर्तीचें उल्लंघन करण्याबद्दल.

२२. जो कोणी कानू १ अ, २, ३, ४, ५, ६, ७, ८, ९, १० व ११ यांपैकीं कोणत्याहि कानूचें, किंवा १३ व्या कानूअन्वयें दिलेल्या लैसेन्साच्या कोणत्याहि शर्तीचें, उल्लंघन करील त्यास पराकाष्ठा पन्नास रुपयेपर्यंत दंडाची शिक्षा होईल, आणि दंड न दिल्यास, पराकाष्ठा एक महिनाच्या मुदतीपर्यंत नुस्त्या कैदेची शिक्षा होईल.

१२ व्या कानूचें उल्लंघन करण्याबद्दल.

२३. जो कोणी १२ व्या कानूचें उल्लंघन करील त्यास पराकाष्ठा वीस रुपयेपर्यंत दंडाची शिक्षा होईल, आणि दंड न दिल्यास, पराकाष्ठा दाहा दिवसांच्या मुदतीपर्यंत नुस्त्या कैदेची शिक्षा होईल.

## मीठ सांठवून ठेवण्यासाठीं व कबज्यांत ठेवण्यासाठीं द्यावयाच्या लैसेन्साचा नमुना (कानू १३ पहा).

मी——————————, मिठाच्या महसुलाचा कलेक्टर, ——————————हल्लीं वस्ती——————तालुका—————— जिल्हा——————यास,——————जिल्ह्यांतील—————— तालुक्यांतल्या——————गांवांत असलेली खालीं सांगितलेली इमारत (किंवा, प्रसंगाप्रमाणें, आवार अगर ठिकाण) यांत, ह्मणजे,—————— ह्मणून प्रसिद्ध असलेली व——————स्ट्रीटच्या——————बाजूस असलेली व जिला ——————च्या म्युनिसिपालिटीनें नंबर——————हा नंबर दिला आहे ती इमारत (किंवा, प्रसंगाप्रमाणें, आवार अगर ठिकाण) यांत, विक्रीच्या कारणासाठीं मीठ सांठवून ठेवण्याचा किंवा तें आपल्या कबज्यांत ठेवण्याचा यावरून अधिकार देतों, मात्र इतकेंच कीं त्यानें खालील शर्तींस अनुसरून वागलें पाहिजे, ह्मणजे:

(१) त्यानें किती मीठ घेतलें तें, असें मीठ ज्या मनुष्यांकडून व ज्या मिठागरांत घेतलें त्या मनुष्यांचीं व त्या मिठागरांचीं नांवें, अशा मिठाबावदच्या परवान्याचा नंबर व तारीख, आणि असें मीठ कोणत्याहि बंदरीं जमिनीवर उतरलें असल्यास त्या बंदरांचीं नांवें हीं, व तसेंच तो ज्या मनुष्यांस मीठ विकील त्यांचीं नांवें आणि प्रत्येक मनुष्यास किती मीठ दिलें तें खरोखर दाखविणारा दररोजचा तपशीलवार हिशोब त्यानें ठेविला पाहिजे व मिठाच्या खात्यांतील जो कोणताहि अमलदार पाहावयास मागेल त्या अमलदारास कोणत्याहि वेळीं तपासतां यावा ह्मणून तो त्यानें तयार ठेविला पाहिजे.

(२) त्यानें मागील महिन्यांत एकंदर किती मीठ घेतलें व किती विकलें आणि त्या महिन्याच्या शेवटीं किती मीठ दास्तानांत शिलक राहिलें तें दाखविणारा, त्यास वेळोवेळीं फर्माविण्यांत येईल त्या नमुन्याप्रमाणें, एक संक्षिप्त हिशोब त्यानें—————— येथील सरकारकुनास प्रत्येक महिन्याच्या पहिल्या तारखेस सादर केला पाहिजे.

(३) त्यानें ८० तोळ्यांचा एक शेर अशा ४० शेरांहून अधिक मीठ एकाच मनुष्यास, आपल्या खासगी खर्चासाठीं त्याहून आधिक मीठ बाळगण्याबदलचा, किंवा सन १८९० च्या मुंबईच्या २ ऱ्या आक्टाच्या ३६ व्या कलमांत सांगितलेल्या हद्दींबाहेरील कोणत्यातरी जागेस किंवा त्या हद्दींतील कोणत्यातरी लैसेन्स मिळालेल्या इतर दुकानास अगर वखारीस त्याहून अधिक मीठ नेण्याबदलचा, सन १८९० चा मुंबईचा मिठाचा आक्ट २ रा याचें कलम ३८ (२) याअन्वयें दिलेला, व माझी किंवा विवक्षित काळीं हुद्यावर असणाऱ्या माझ्या स्थानापन्नाची, अगर माझे डेप्युटी किंवा असिस्टंट यांतून एकाची योग्य रीतीनें सही झालेला विशेष परवाना त्या मनुष्यानें हजर केल्याखेरीज, विकूं नये.

(४) त्यानें हा लैसेन्स दुसऱ्या कोणत्याहि मनुष्याच्या नांवावर करून देऊं नये, व या लैसेन्साच्या वाहण्यानें, आपणाशिवाय किंवा——————येथील सरकारकुनानें त्या कारणासाठीं योग्य रीतीनें मंजूर केलेल्या त्याच्या नोकरांशिवाय इतर कोणत्याहि मनुष्यास मीठ विकण्याची परवानगी देऊं नये, व अशा नोकरांच्या नांवांची एक यादी त्यानें, फर्माविण्यांत येईल त्या त्या वेळीं, सदर्हू सरकारकुनास सादर केली पाहिजे.

(५) (फक्त फुटकळ विक्रीच्या लैसेन्सांसाठीं.)

त्यानें कोणत्याहि वेळीं ५० बंगाली मणांहून, किंवा जें परिमाण मी किंवा हुद्यावर असलेला माझा स्थानापन्न विशेष हुकुम करून ठरवील त्या परिमाणाहून, अधिक मीठ दास्तानांत ठेवूं नये.

( फक्त ठोक विक्रीच्या लैसेन्सासाठीं. )

त्यानें आपल्या कबज्यांतील सर्व मीठ गोणांमध्यें भरून ठेवलें पाहिजे; व प्रत्येक गोणांत एका मणाहून कमी किंवा तीन मणांहून ज्यास्त मीठ असूं नये.

(६) हा लैसेन्स सन १८९ च्या ——— महिन्याच्या ——— तारखेपासून सन १८९ च्या ——— महिन्याच्या ——— तारखेपर्यंत अमलांत राहील, पुढें अमलांत राहणार नाहीं; परंतु तो, सदहू ——— यानें किंवा त्याच्या कोणत्याहि नोकरानें त्यांतील कोणत्याहि शर्तीचें किंवा सन १८९० च्या मुंबईच्या मिठाच्या आक्टांतील कोणत्याहि ठरावाचें उल्लंघन केल्यास, माझेकडून किंवा माझ्या डेप्युटींपैकीं एकाद्या डेप्युटीकडून कोणत्याहि वेळीं सस्पेंड केला जाण्यास किंवा रद्द केला जाण्यास पात्र आहे असें समजावें.

आज तारीख माहे सन १८९ रोजीं ——— येथें माझ्या सहीशिक्यानिशीं दिला असे.

मिठाच्या महसुलाचा कलेक्टर.

आलाजा धि रैट आनरबल धि
गव्हर्नर इन् कौन्सिल यांच्या
हुकुमावरून,
( सही ) जी. डब्ल्यू. व्हायडल,
आक्टिंग चीफ सेक्रेटरी निसबत सरकार.

(True Translation)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.



BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.